नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/08/2023 (सोमवार) दुपार

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ८०३,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन रामटेकची कारवाई

दिनांक १३/०८/२०२३ रोजीचे ०२.१५ वा. ते ०३.१५ वा. दरम्यान पोलीस रामटेक येथील स्टाफ पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, एक निळया रंगाचा ट्रॅक्टर मध्ये काचुरवाही गावाचे रोडने अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता स्टाफसह काचुरवाही गावात जाणाऱ्या मार्गावर उभे असतांना दि. १३/०८/२०२३ चे ०२.०० वा. सुमारास गावात एक ट्रॅक्टर येतांना दिसल्याने त्यास हात दाखवुन थांबण्याचा इशारा केला. त्यावरून ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर रोडच्या बाजुला थांबविला तेव्हा सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता सदर ट्रॅक्टरचा क्र. एम. एच. ४०/सी. ए.— ८४०९ असा दिसल्याने सदर ट्रॅक्टर चालकास त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव निलेश इच्छुलाल दमाहे, वय ३७ वर्ष, रा. चिचाळा ता. रामटेक असे सांगितले. त्यानंतर त्यास ट्रॅक्टरच्या मागील डाल्यात काय आहे? असे विचारले असता त्याने रेती (वाळू असल्याचे सांगितले. तेव्हा त्यास रेती वाहतुकीबाबत परवाना विचारले असता त्याने परवाना नाही असे सांगितल्याने सदर ट्रॅक्टर चालकाचे ताब्यातून ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४० सी.ए. ८४०९ किंमती ८००,०००/—रु. व अंदाजे १ ब्रास रेती ३०००/— रू. प्रति ब्रास प्रमाणे किंमती ३,०००/— रू. असा एकुण ८०३,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हे नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदर कारवाई श्री. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग आशित कांबळे, पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उदय नारायण यादव, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोलीस नायक मंगेश सोनटक्के, प्रफुल रंधई, पोलीस शिपाई शरद गिते यांनी केली आहे.

# दरोडा

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा जित पंजाबी धाबा हळदगाव येथे दिनांक १३/०८/२०२३ चे ०३.३० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– १) देवसींग भटटी (सरदार) रा. बुट्टीबारी २) करन राजपुत रा. सिडको बटुटीबोरी ३) सोजल चिचघरे रा. तुरकमारी व त्याचे सात ते आठ साथीदार** यांनी धाब्यावर जावुन फिर्यादी नामे– कमलेश रमेश दोनोडे, वय २९ वर्ष रा. पंचायत समीती कॉलनी गोंविदपुर रोड गोंदीया ह. मु. जीत पंजाबी धाबा हळदगाव ता. हिंगणा जि. नागपुर याला जेवनाबाबत विचारले असता त्यांना धाबा बंद झाला असुन जेवन संपल्याचे सांगीतले यावरून आरोपीतांनी चाकुचा धाक दाखवुन व हातबुक्कीने मारहान करून शिवीगाळ केली व फिर्यादी यांचे पॅन्टच्या खिशातुन १२,३००/– रू तसेच फिर्यादी याचे मित्र नामे– भाकरा सोनकर याचे पॅटचे खिशातुन २०,०००/– रू व अजित गुप्ता यांचे पॅन्टचे खिशातुन १०,०००/– रू असे एकुण ४२,३००/– रू. जबरीने हिसकावुन काढुन घेवुन गेले व कोणाला काही सांगीतले तर मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९५, ३२३, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) व ३) यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भोयर मो. नं. ९९२३१११२७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**